आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१९ नोव्हेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी उद्या होणाऱ्या मतदानाकरता निवडणूक यंत्रणा सज्ज, मतदारांसाठी विविध सोयी सुविधा /२८८ जागांसाठी ३६३ महिलांसह ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात

- पैसे वाटप प्रकरणी भाजपा नेते विनोद तावडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू, आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल, अटक करण्याची काँग्रेसची मागणी

- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीही उद्या मतदान, कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात

**आणि**

- महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारत अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी उद्या सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. त्यासाठी अधिकारी-कर्मचारी मतदान केंद्रांवर रवाना झाले आहे. राज्यात यंदा ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार २८८ आमदारांना निवडून देणार आहे. त्यांच्यासाठी १ लाख ४२७ मतदान केंद्रं उभारली असून दुर्गम भाग वगळता इतर ठिकाणी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ पर्यंत मतदान होईल.

विधानसभा निवडणुकीत महिला मतदारांचं प्रमाण लक्षणीय असून राज्यभरात ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. राज्यातली ४२६ मतदान केंद्र महिलांकडून संचलित केली जाणार आहेत. शहरी भागात मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी गृहनिर्माण संकुलामध्ये तसंच झोपडपट्टी भागात मतदान केंद्र उभारली आहेत.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात ३ हजार ७७१ पुरुष, ३६३ महिला आणि २ तृतीयपंथी आहेत.

१५८ पक्षांकडून २ हजार ५० उमेदवार रिंगणात आहे. उर्वरित २ हजार ८६ अपक्ष आहेत. सर्वाधिक २३७ उमेदवार बहुजन समाज पार्टीनं उभे केले असून वंचित बहुजन आघाडीचे २०० उमेदवार रिंगणात आहेत. भाजपानं १४९, मनसेनं सव्वाशे, काँग्रेसनं १०१ उमेदवारांना निवडणुकीत उतरवलं आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून ९५, शरद पवारांकडून ८६, एकनाथ शिंदेंकडून ८१, अजित पवारांकडून ५९ उमेदवार नशीब आजमावत आहेत.

**बीड** जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात सर्वाधिक ३४ उमेदवार रिंगणात आहेत. **नांदेड** लोकसभा पोटनिवडणुकीसाठीही उद्या मतदान होणार आहे आणि त्याठिकाणी १९ उमेदवार पात्र ठरले आहेत.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात नालासोपाऱ्यामध्ये भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्या विरुद्ध आचारसंहिता भंगाची तक्रार दाखल झाली आहे. तावडे पैसे वाटत असल्याचा आरोप करत त्याबाबत बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी व्हिडीओ प्रसिद्ध केला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी दिली आहे.

तर, बविआ कार्यकर्त्यांचा गैरसमज झाला आहे. सर्व घटनाक्रम सीसीटीव्हीमध्ये टिपला गेला आहे. मी केवळ भाजपा कार्यकर्त्यांसोबत चहापानासाठी गेलो होतो आणि चर्चा करत होतो. त्यावेळी माझ्याकडून पैसे वाटप होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या संदर्भातलं सीसीटीव्ही चित्रण तपासावं, निवडणूक आयोगकडून चौकशी होऊ द्या, असं विनोद तावडे यांनी याबाबत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

विरोधकांनी पूर्वनियोजित षडयंत्र करून आरोप केले आणि तावडे यांना गोवण्यात आलं, असा आरोप भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

याप्रकरणी तावडे यांच्या अटकेची मागणी काँग्रेसनं केली आहे. तावडे यांच्याकडे सापडलेली रक्कम नेमकी कुणाच्या तिजोरीतून आली आहे? जनतेचा पैसे लुटून तुमच्याकडे कुणी पाठवला, असा प्रश्न काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी समाज माध्यमावर केला आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे,बविआ नेते हितेंद्र ठाकूर यांनी याप्रकरणी भाजपावर टीका केली आहे.

दरम्यान, डहाणू विधानसभा मतदारसंघात बहुजन विकास आघाडीकडून उमेदवारी मिळालेल्या सुरेश पाडवी यांनी मतदानाच्या आदल्या दिवशी भाजपामध्ये प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला सर्वांनी मतदान करावं यासाठी महाराष्ट्राच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केलेलं आवाहन आता ऐकूया…

**होल्ड बाईट सुजाता सौनिक**

**<><><><><>**

**श्रोते हो,**

राज्यभरातल्या मतदानाचा आढावा घेण्यासाठी उद्या संध्याकाळी ७ चे बातमीपत्र १५ मिनिटांचे प्रसारित केले जाईल. त्यानंतर सव्वा ७ ते सव्वा ८ या दरम्यान मागोवा मतदानाचा या विशेष कार्यक्रमात राज्यभरातल्या मतदानाची वैशिष्ट्य आपण जाणून घेणार आहोत. त्यानंतर सव्वा ८ ते साडे ८ दरम्यान राष्ट्रीय बातमीपत्र प्रसारित होईल.

**<><><><><>**

झारखंड मध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. या टप्प्यात उद्या झारखंडच्या १२ जिल्ह्यातल्या

३८ मतदारसंघांसाठी सकाळी ७ ते सायंकाळी ५ यावेळेत मतदान होणार  असून ३१ नक्षलग्रस्त भागांत मात्र सुरक्षेच्या कारणास्तव सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान होईल.

या निवडणूकीत ५५ महिला उमेदवारांसह ५२८ उमेदवार रिंगणात आहेत. सुमारे १ कोटी २३ लाख मतदार या उमेदवारांचे भवितव्य ठरवणार आहेत. आंतरजिल्हा सामा  बंद केल्या असून घुसखोर आणि समाजविरोधी घटकांना रोखण्यासाठी बिहार आणि पश्चिम बंगालच्या सीमावर्ती भागात संयुक्त कारवाई सुरू आहे. कोणत्याही आव्हानात्मक  प्रसंगाला तोंड देण्यासाठी हेलिकॉप्टरची सेवा सुरू केली आहे. प्रत्येक मतदानकेंद्रावर  केंद्रीय निमलष्करी दलाचे जवान तैनात केले आहेत.

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, सभापती रवींद्र नाथ महतो, भाजपा प्रदेशअध्यक्ष बाबूलाल मरांडी, विरोधी पक्षनेते अमरनाथ कुमार बौरी, AJSU चे  अध्यक्ष सुदेश कुमार महतो आणि कल्पना सोरेन हे महत्त्वाचे उमेदवार  आहेत. इरफान अन्सारी, हाफिझुल हसन, दीपिका पांडे सिंग आणि बेबी देवी हे चार मंत्रीही रिंगणात आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी मतदारांना निर्भीडपणे मतदान करण्याचं आवाहन  केलं आहे.

**<><><><><>**

महिलांच्या आशियाई चषक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघानं आज प्रवेश केला. उपांत्य फेरीत भारतानं जपानवर २-० अशी मात केली. अंतिम फेरीत भारताची गाठ चीनशी पडेल. उपांत्य फेरीत चीननं मलेशियाला ३-१ असं नमवलं. स्पर्धेचा अंतिम सामना उद्या संध्याकाळी बिहारमध्ये राजगीर हॉकी मैदानावर पावणेपाच वाजता सुरू होईल.

**<><><><><>**

शेंझेन इथे चीन ओपन मास्टर्स बॅडमिंटन सामन्यात मिश्र दुहेरीत बी. सुमिथ रेड्डी आणि एन. सिक्की रेड्डी या  भारताच्या जोडीने  प्रिसली स्मिथ आणि जेन्नी गाय या अमेरिकन जोडीला पराभूत केलं.

महिला एकेरीत आकर्षी कश्यप सुरुवातीच्या सामन्यात जपानच्या तोमोको मियाझाकीकडून पराभूत झाली. पुरुष एकेरीत प्रियांशू राजावतने इंडोनेशियाच्या बॅडमिंटनपटूशी कडवी झुंज दिली, पण त्याला हार पत्करावी लागली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज रिओ द जानेरो इथं जी-20 परिषदेच्या निमित्तानं, ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ ईनाचिओ लुलादा सिल्व्हा यांच्याशी चर्चा केली. यावेळी दोन्ही नेत्यांनी ऊर्जा, जैव इंधन, संरक्षण, आणि कृषी इत्यादी विविध क्षेत्रांमधल्या सहकार्यात सुधारणा करण्याबाबत कटीबद्धता व्यक्त केली. भारत आणि ब्राझील यांच्यातल्या द्विपक्षीय संबधांचा व्यापक आढावा या चर्चेत घेतल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमांवर सांगितलं आहे.

**<><><><><>**

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला उद्यापासून गोव्यात सुरुवात होत आहे.  या महोत्सवात ८१ देशांमधले एकूण १८० चित्रपट प्रदर्शित केले जातील.  जागतिक चित्रपटाच्या दुनियेतले आगळेवेगळे स्वर आणि नवोन्मेषशाली कथन अधोरेखित करणाऱ्या इफ्फी या महोत्सवाचं हे पंच्चावन्नावं वर्ष आहे. हा महोत्सव २८ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

**//<><><><><>//**